# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०३/११/२०१८

### टायरच्या टयुबमध्ये गावठी दारूची वाहतुक करणारे इसमावर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

---

जिल्हयातील महामार्गांवर अवैधरित्या होणारे मद्यवाहतुकीस आळा बसावा यासाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कारवाई सुरू आहे. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गावर मालेगाव ते दरेगाव शिवारात अवैधरित्या गावठी दारूची टायरच्या टयुबमध्ये वाहतुक करणारे इसमावर छापा टाकला.

दिनांक ०२/११/२०१८ रोजी रात्रीचे सुमारास स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमांवर कारवाई करणेसाठी मालेगाव परिसरात गस्त घालत होते. दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे, धुळे जिल्हयातील काही इसम मालेगाव शहरात गावठी दारूची अवैधरित्या विक्री करतात बाबत समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मालेगाव परिसरातील मुंबई आग्रा महामार्गावर दरेगाव पुलाखाली सापळा रचुन मालेगाव शहराकडे येणारे अॅपे रिक्षा क्र. एम.एच.१८.डब्ल्यु.८९७२ हे वाहन पाठलाग करून अडविले. सदर अॅपे रिक्षावरील चालक **नामे संदिप कैलास भदाणे, वय २७, रा. वडजाई, ता.जि.धुळे** यास जागेवरच ताब्यात घेवुन रिक्षाची झडती घेतली असता, पुढील सिटचे खाली लोखंडी बॉक्समध्ये सफेद रंगाचे ०२ गोण्यांमध्ये **टायरच्या टयुबमध्ये अंबट उग्र वासाची १०० लिटर गावठी दारू** मिळुन आली. सदर इसमाकडे चौकशी केली असता, धुळे जिल्हयातील पिंप्री येथील इसम नामे भाईदास उर्फ रायसिंग आहिरे याचे मालकीचे दारू अड्डयावरून मालेगावात सदरची गावठी दारू विक्री केली जाते बाबत समजले. सदर छाप्यात ताब्यात घेतलेले इसमाचे कब्जातुन १०० लिटर गावठी दारू व अॅपेरिक्षा असा **एकुण १ लाख ४५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला असुन **पवारवाडी पोलीस ठाणेस** वरील दोन्ही इसमांविरूध्द **मुंबई दारूबंदी कायद्यान्वये** गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप दुनगहू, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैधरित्या मद्याची वाहतुक करणारे इसमांवर यापुढेही अशाच प्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.